# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : १२/०७/२०२३

### प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

महानगरपालिका स्थानिक स्वराज्य कल्याणकारी संस्था आहे. शहरातील नागरीकांना मुलभुत सेवा व सुविधा पुरविण्याचे कार्य करीत आहे. महानगरपालिका अधिनस्त मालमत्ता व उपक्रम यांचे प्रति माह येणा-या विजेचा देयकाचा भरणा महानगरपालिकेमार्फत करण्यात येतो. महानगरपालिकेस वाणिज्य दरसुची प्रमाणे महावितरण कंपनी कडून देयक देण्यात येत होते. परंतु वाणिज्य दरसुची वर्गवारीचे प्रति युनिट दर फारच जास्त होता.

महानगरपालिका मार्फत पुरविण्यात येणा-या सेवा / सुविधा पब्लिक सर्व्हिसेस (इतर) वर्गवारी मध्ये येत असल्याने महावितरण कंपनी कडून महानगरपालिकेस प्राप्त होणा-या देयकाला पब्लिक सर्व्हिसेस (इतर) दराने देयक देण्यात यावे असा प्रस्ताव तयार करुन महावितरण कंपनीला सादर करण्यात आला. सततच्या पाठपुराव्यामुळे वाणिज्य दरसुची वर्गवारीमध्ये बदल करुन सर्व प्रशासकीय कार्यालये व मनपा अधिनस्त सर्व मालमत्ता इ. पब्लिक सर्व्हिसेस (इतर) दरसुची वर्गवारीप्रमाणे समावेश करुन देयक देण्यात आली.

पब्लिक सर्व्हिसेस (इतर) दराचे प्राप्त् देयकाला अतिरिक्त २१% विद्युत शुल्काचा भरणा महावितरण कंपनीला करावा लागत आहे असे निदर्शनांस आले.

महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी कायदा २०१६ मधील कलम ३(२) (iii) नुसार स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत निहित असलेल्या सर्व सेवा/उपक्रम इ. अधिनियम तरतुदीमध्ये विद्युत शुल्कबाबत सवलत देण्यात आली असे नमुद आहे.

महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी कायदा २०१६ मधील कलम ३(२) (iii) तरतुदीच्या अधिन राहुन विद्युत शुल्क माफीचा प्रस्ताव महावितरण कंपनीला पाठविण्यात आला. परंतु महावितरण कंपनीच्या NSC संगणकीय प्रणालीमध्ये विद्युत शुल्क बाबत कोणतेही प्रयोजन नाही किंवा महावितरण कंपनीच्या कायद्यामध्ये कोणतीही तरतुद नाही असे महावितरण कंपनीकडुन सांगण्यात आले . कायद्यामध्ये विद्युत शुल्क माफीबाबत तरतुद आहे तर महावितरण कंपनीकडून महानगरपालिकेस का देवु शकत नाही ? याबाबत मुख्य अभियंता ( वाणिज्य / माहीती तंत्रज्ञान विभाग) महावितरण कंपनी, मुख्यालय प्रकाशगड, मुंबई यांना लेखी पत्र पाठविण्यात आले.

सततच्या पाठपुराव्याची दखल घेवुन मुख्य अभियंता (वाणिज्य), महावितरण कंपनी, प्रकाशगड, मुंबई यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाना पब्लिक सर्व्हिसेस (इतर) दरसुची विद्युत शुल्क माफ बाबतचा स्वतंत्र अद्यादेश दिनांक २७/०३/२०२३ रोजी निर्गमित केला. मुख्य अभियंता (माहीती तंत्रज्ञान) यांनी सर्व पब्लिक सर्व्हिसेस (इतर) वर्गवारी करीता महावितरण वेबसाईटवर Link व NSC पोर्टलवर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे पब्लिक सर्व्हिसेस (इतर) दरसुची वर्गदारीमध्ये देयकाचे समायोजन केले तर देयकामध्ये ५०% जास्त बचत व संपुर्ण विद्युत शुल्क माफ होणार आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाठपुराव्यामुळे झालेल्या या अद्यादेशाचा फायदा महाराष्ट्रातील सर्व शासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्था यांना होणार आहे.

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.